# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### वरोरा व भद्रावती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतक-यांच्या मागण्यांच्या अहवालाबाबत

**(१) २४७२७ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा व भद्रावती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतक-यांच्या मागण्यांबाबत मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे त्यांच्याकडून अहवाल देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय.

चंद्रपूर जिल्हयामध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप हंगामातील भात, ख. ज्वारी, सोयाबीन, तुर व कापूस या पिकांसाठी तसेच रब्बी हंगामातील गहु (बा.), गहु (जि.), ज्वारी (जि.) व हरभरा या पिकांसाठी राबविण्यात येत आहे. वरोरा व भद्रावती या दोन्ही तालुक्यांमधील वरील पिकांचा राष्ट्रीय कृषि विमा योजनेत समावेश केलेला आहे.

खरीप हंगाम २०१४ मध्ये नागपूर विभागातील ०.५४ लाख शेतकऱ्यांना रक्कम २९.०६ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. त्यापैकी चंद्रपूर जिल्हयातील ३५९१० शेतकरी योजनेच्या अटी व शर्तीनुसार नुकसान भरपाईस पात्र ठरले असून त्यांना नुकसान भरपाईपोटी रक्कम रु. २०.४४ कोटी भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे.

तसेच खरीप हंगाम २०१६ पासून सुधारीत स्वरुपात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत असून, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या पीकांना विमा संरक्षण देण्यात आलेले आहे. चंद्रपूर जिल्हयातील खरीप हंगामातील भात, ख. ज्वारी, सोयाबीन, तूर व कापूस या पिकांचा तसेच रब्बी हंगामातील गहु (बा.), गहु (जि.), ज्वारी (जि.), व हरभरा या पिकांचा प्रस्तुत योजनेत समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात युरोपच्या धर्तीवर आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्याबाबत

**(२) ६५४३७ (२७-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा आपत्ती व्यवस्थापन विभाग युरोपच्या धर्तीवर अद्ययावत होणार असल्याचे माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नेमके कोणकोणत्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्यात येणार आहे व नेमक्या कोणकोणत्या सुधारणा करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदरची हायटेक व्यवस्थापन प्रणाली कशा प्रकारे कार्यान्वित केली जाणार आहे,

(४) तसेच, आपत्ती व्यवस्थापन विभागामध्ये सदरचे बदल कधीपर्यंत केले जाणार आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन वसाहतींना गावठाण दर्जा देण्याबाबत

**(३) ८८४१५ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील २५ प्रकल्पांच्या १२५ पुनर्वसन वसाहतींना गावठाण दर्जा देण्याची मोहीम सुरु करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, पुणे यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मोठ्या प्रमाणात लागणारा कालावधी कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी पुनर्वसित वसाहतींना गावठाण दर्जा देण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या पत्रानुसार प्रदान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड (जि.पुणे) तालुक्यातील १२ गावांना नवीन गावठाणाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मार्च, २०१७ रोजी पत्राद्वारे उपविभागीय अधिकारी, खेड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरच्या १२ गावांसह इतर सर्व पुनर्वसन वसाहतींना नवीन गावठाणाचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०८-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) खेड तालुक्यातील १२ पुनर्वसन गावापैकी ६ गावांना दिनांक ३१.७.२०१७ व दि.३.८.२०१७ नुसार गावठाणांचा दर्जा देण्यात आलेला आहे. व उर्वरित ६ गावठाणांना गावठाण दर्जा देणेची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, खेड यांचे मार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बरबडा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील पुनर्वसनातील लाभार्थी बेघर असल्याबाबत**

**(४) ८९०१२ (१५-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बरबडा (ता.नायगाव, जि.नांदेड) येथे सन २००६-२००७ मध्ये आलेल्या धील गोदावरीच्या पुरामुळे बेघर झालेले लाभार्थी पुनर्वसीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन तहसिलदारांसह मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या चुकीच्या सर्व्हेमुळे खरे लाभार्थी वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुनर्वसन वसाहतीत योग्य मुलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पुनर्वसनात लाभार्थ्यांना घरे वाटप करण्याबाबत तसेच पुनर्वसन वसाहतीत योग्य मुलभूत सोयी सुविधां देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही, मौजे बरबडा (ता. नायगाव, जि.नांदेड) हे गाव सन २००५ च्या पुराने बाधित आहे.
(२) हे खरे नाही. पुरामुळे बाधित २४८ कुटुंबाचे पुनर्वसन करावयाचे निश्चित केले होते. सन २०१६ मध्ये बाधितांना घरे वाटपाच्या वेळेस १९ लोकांनी लाभार्थींच्या यादीत समावेश नसल्याने घर वाटपास विरोध केला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, बिलोली यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे. विद्युतीकरणाचे काही प्रमाणात काम प्रलंबित आहे. प्रलंबित विद्युतीकरणाचे काम करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्वच प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहनांचे पासिंग होत नसल्याबाबत**

**(५) ९५०८५ (२७-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये पासिंग करणाऱ्यांसाठी वाहनचालकांच्या मोठया रांगा लागत असून वाहन निरिक्षकही नियमावर बोट ठेऊन दिवसाला २० किंवा २५ वाहनांचेच पासिंग करत असल्याने व वारंवार नंबर लावूनही पासिंग होत नसल्याने वाहनचालकांचा वेळ वाया जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीअंती न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे २० मीटरचा ट्रॅक उपलब्ध नसला तरी सार्वजनिक रस्त्यावर वाहनांचे ब्रेक आणि हेड लाईटची चाचणी होत असल्याने न्यायालयाच्या निर्णयात न्यायालयाने शिथीलता आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. २८/२०१३ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशांप्रमाण एकूण ३७ कार्यालयांमध्ये वाहनांची तपासणी करण्यासाठी ब्रेक टेस्ट ट्रॅकची उभारणी केली आहे. तर उर्वरीत ठिकाणी कार्य प्रगतीपथावर आहे. मा.न्यायालयाने सार्वजनिक रस्त्यावर वाहनांची तपासणी करणे प्रतिबंध केलेला असल्यामुळे ब्रेक टेस्ट ट्रॅक उपलब्ध नसलेल्या ठिकाणी खाजगी जागेवर अथवा जवळच्या ब्रेक टेस्ट ट्रॅकवर वाहनांची तपासणी केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील जेटीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(६) ९५१२० (२९-१२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे केंद्रीय कृषी योजनेंतर्गत मच्छिमारांसाठी सुविधा पुरविणे या योजनेतुन सन २०१२-१३ मध्ये सुरू झालेले जेटीचे बांधकाम गत ३ वर्षांपासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच मच्छिमार सहकारी सोसायटी यांचेकडून सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी तसेच पतन अभियंता कार्यालय, रत्नागिरी यांचेकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जेटीचे काम रखडल्याने मौजे साखरीआगर व परिसरातील मच्छिमार बांधव, मच्छिव्यवसायिक तसेच या व्यवसायावर अवलंबून असलेल्या असंख्य छोट्या-मोठ्या व्यवसायिकांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जेटीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रश्न भाग २ बाबत तक्रारींची दखल न घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०७-२०१८) :** (१) होय.
(२) सदर काम तातडीने मार्गी लावण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व मच्छिमार सहकारी सोसायटी यांचेकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरणाने दि. १९.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर कामास सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) ची परवानगी न घेता काम सुरु करू नये, अशी नोटीस दिलेली असल्यामुळे काम थांबविण्यात आलेले आहे.
(३) नाही.
(४) सदर जेट्टीचे काम पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरण (एमसीझेडए) ची परवानगी प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरणाच्या दि.१९.०५.२०१६ रोजीच्या पत्रापुर्वीच्या कालावधीत ठेकेदाराने निविदा शर्तीप्रमाणे कामात प्रगती न राखल्याने ठेकेदारावर दि.०१.०४.२०१३ पासुन रू.२००/- प्रतिदिन, दि.०१.०५.२०१४ पासुन रू.५००/- प्रतिदिन तर दि.०१.०२.२०१५ पासुन रू.१०००/- प्रतिदिन अशी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पावसाळ्यात विज पडून मृत्यू होणे किंवा अपंगत्व येणे इ. घटनांचा समावेश नैसर्गिक आपत्तीमध्ये करण्याचा निर्णय

**(७) ९५२९४ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पावसाळ्यात विज पडून मृत्यू होणे किंवा अपंगत्व येणे इ. घटनांचा समावेश नैसर्गिक आपत्तीमध्ये करण्याचा निर्णय तसेच वीज पडून मृत्यु झाल्यास त्या व्यक्तिच्या

कुटुंबाला ४ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे ऑक्टोबर, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) वीज पडून मुत्यू झाल्यास योग्य त्या प्राधिकाऱ्याने मृत्युचे कारण प्रमाणित करण्याच्या अधिन राहून मृत व्यक्तींच्या वारसांना रु.४ लाखाची मदत अनुज्ञेस राहिल. तसेच इस्पितळातील वैद्यकिय अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास ४० ते ६० टक्के अपंगत्व असल्यास रु. ५९,१००/- व ६० टक्क्यापेक्षा अधिक अपंगत्व असल्यास रु.२ लक्ष इतकी मदत अनुज्ञेय राहील. एक आठवडयापेक्षा अधिक कालावधीकरिता इस्पितळात दाखल झाल्यास रु.१२,७००/- व त्यापेक्षा कमी असल्यास ४,३००/- इतकी मदत अनुज्ञेय राहील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील वाहनधारकांना वाहने पासिंग करुन मिळण्याबाबत

**(८) ९८४४५ (२७-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील मालवाहू व प्रवासी वाहनांच्या पासिंगसाठी पाच एकर जागेची आवश्यकता असतांना कोल्हापूर जिल्हयात महसूल विभाग केवळ १५ गुंठेच जागा देत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे वाहनधारकांना वाहने पासिंग करुन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,चौकशीअंती वाहनधारकांना वाहने पासिंग करुन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दि.२७.१.२०१७ नुसार मौजे मोरेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील गट नं.६६ (जुना गट क्र. ७०/१) मधील फक्त २५०x ६ मी. लांबीची १५ गुंठे जागा ब्रेक टेस्टसाठी उपलब्ध करुन दिली आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही. उपलब्ध झालेल्या जागेवर ब्रेक टेस्ट ट्रॅक ची उभारणी करुन योग्यता प्रमाणपत्र चाचणी दि.१३.११.२०१७ पासून प्रत्यक्ष चालु करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त वाहन योग्यता तपासणीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर मार्फत पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगलुर व बिलोली (जि.नांदेड) या तालुक्यातील पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधांची कामे करण्याबाबत**

**(९) १००१२३ (२७-१२-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलुर व बिलोली (जि.नांदेड) या तालुक्यातील पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधांची कामे करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधांची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) देगलूर व बिलोली (जिल्हा नांदेड) तालुक्यातील १९६३ व १९८३ मधील पूरपुनर्वसित गावामध्ये त्यांच्या मूळ पूरबाधित गावात ज्या सुविधा उपलब्ध होत्या त्या सुविधा शासनामार्फत पुरविण्यात आल्या आहेत.शासनाच्या प्रचलित पूरपुनर्वसन योजनेनुसार मूळ पूरग्रस्त गावात ज्या सुविधा उपलब्ध होत्या त्या सुविधा नवीन पुनर्वसित गावामध्ये शासनामार्फत फक्त एकदाच पुरविण्यात येतात. त्यानंतर त्या सुविधा पुढील देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित जिल्हा परिषद/ग्राम पंचायतीकडे हस्तांतरित करण्यात येतात.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील तारळ व वाडापाल्ये खारभूमी योजनेला सि.आर.झेड. मधून सुट मिळणेबाबत**

**(१०) १००४८३ (०६-०१-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तारळ व वाडापाल्ये खारभूमी योजनेला सि.आर.झेड. मधून सुट मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास व त्यानंतर अनेक वेळा मा.मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार करूनही अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनस्तरावर अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१८) :** (१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) तारळ खारभूमी योजना ही खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात नाही.

तसेच वाडापाल्ये खारभूमी योजनेचे शीघ्र पर्यावरण प्रभाव मूल्यमापन सर्वेक्षण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून सदर काम लवकरच सुरु करण्यात येत आहे.

(२) वाडापाल्ये खारभूमी योजनेच्या १६ हेक्टर पुन:प्रापित क्षेत्रास किनारा नियमन क्षेत्रामधून (सी.आर.झेड.) सूट प्राप्त आहे. सदर योजनेच्या वाढीव ५ हेक्टर पुन:प्रापित क्षेत्रास सी.आर.झेड. मधून सूट मिळण्याकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने या योजनेला सी.आर.झेड. मधून सूट देण्यापूर्वी सदर योजनेचे शीघ्र पर्यावरण प्रभाव मूल्यमापन (Rapid Environmental Impact Assessment) सर्वेक्षण करणेच्या सूचना महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, मुंबई यांनी दिल्या आहेत.

त्यानुसार वाडापाल्ये खारभूमी योजनेच्या शीघ्र पर्यावरण प्रभाव मूल्यमापन सर्वेक्षणाच्या अंदाजपत्रकास जानेवारी, २०१८ मध्ये सर्वसाधारण मान्यता प्राप्त असून सदर काम सुरु करण्यात येत आहे.

तसेच तारळ खारभूमी योजना ही खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात नाही.

खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात घेण्याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाबाबत नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यानुसार किनारा नियमन क्षेत्र (CRZ) विषयक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार येथील जिल्हा प्रादेशिक मुख्य कार्यालय पालघर किंवा डहाणू येथे करणेबाबत**

**(११) १०२७०९ (२९-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, डहाणू येथील तीन, सहा आसनी ऑटो रिक्षा व इतर वाहनाची पासिंग प्रक्रिया विरारहुन कल्याण येथे होणार असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रक्रिया जिल्हा प्रादेशिक मुख्य कार्यालय पालघर किंवा डहाणु येथे करणे गरजेचे असून पालघर ते कल्याण हे अंतर सुमारे ९० कि.मी. असल्याने श्रम, वेळ व पैसा वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती जिल्हा प्रादेशिक मुख्य कार्यालय पालघर किंवा डहाणू येथे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. २८/२०१३ मध्ये वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, परिवहन वाहनांची ब्रेक तपासणी व योग्यता प्रमाणपत्र तपासणी शासकीय मालकीच्या ब्रेक टेस्ट ट्रॅक वर घेणे बंधनकारक केले आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई येथे शासकीय मालकीच्या जागेत ब्रेक टेस्ट ट्रॅक उपलब्ध नसल्यामुळे दि.१.११.२०१७ पासून वाहन योग्यता चाचणी घेता येत नाही. मौजे गोखिवरे, ता.वसई येथे कार्यालयास ३.३ हे. इतकी शासकीय जागा उक्त प्रयोजनासाठी प्राप्त झाली आहे. तथापि, मा. सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) रे. मु. नं. ०६/२०१७ मध्ये मनाई हुकुम दिला आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये वसई येथे उपलब्ध जागेत वाहनांच्या तपासणीचे काम चालू आहे.

(३) व (४) राज्यामध्ये भविष्यकाळात प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरीता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी अप्पर परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.२.२०१६ रोजीच्या आदेशान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली होती. प्रस्तुत समितीने, नवीन जिल्हा निर्मिती झाल्यास नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. त्या व्यतिरिक्त नवीन कार्यालयाची स्थापना करण्याची आवश्यकता नाही तसेच ज्या जिल्हयांची लांबी जास्त आहे अशा जिल्हयांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे अशा शिफारशी शासनास केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) या शहरात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत**

**(१२) १०३०८४ (२९-१२-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याणचे विभाजन करून नविन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, उल्हासनगर येथे निर्माण करण्याच्या शिफारसीसह प्रस्ताव परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनाकडे बऱ्याच कालावधी पासून सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासंदर्भात त्वरित कार्यवाही होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सर्व शासन स्तरावर लेखी स्वरुपात कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याणचे विभाजन करून नविन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, उल्हासनगर येथे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यामध्ये भविष्यकाळात प्रादेशिक/ उपप्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरीता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी अप्पर परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.२.२०१६ रोजीच्या आदेशान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली होती. अभ्यासगटाने, नवीन जिल्हा निर्मिती झाल्यास नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. त्या व्यतिरिक्त नवीन कार्यालयाची स्थापना करण्याची आवश्यकता नाही तसेच ज्या जिल्हयांची लांबी जास्त आहे अशा जिल्हयांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावे अशा शिफारशी शासनास केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात बुरशीजन्य रोगांमुळे सुपारी व्यवसाय अडचणीत आल्याबाबत**

**(१३) १०४००४ (२७-१२-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात गेल्या सुमारे सहा-सात वर्षात सातत्याने पडणाऱ्या बुरशीजन्य रोगांमुळे सुपारी व्यवसाय संपुष्टात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या रोगाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१८) :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्हयामध्ये सुपारी पिकाच्या एकूण लागवडीखालील क्षेत्र ९६७ हेक्टर असून त्यापासून मिळणारे अंदाजित उत्पादन ६२२.३० टन आहे.

सन २०१३-१४ पासून सन २०१६-१७ पर्यंत २४६ हेक्टर क्षेत्रावर कोळेरोग (सुपारीची गळ) या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्याने जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत पिकसंरक्षण योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर कॉपर ऑक्झिक्लोराईड ५६० डब्ल्युडीपी या औषधाचा पुरवठा करण्यात आला. तथापि, सन २०१७-१८ मध्ये सदर रोगाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात असल्याने व शेतकऱ्यांची मागणी नसल्याने औषधांचा पुरवठा करण्यात आला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वाढत्या वाहनांच्या समस्येबाबत**

**(१४) १०४८३३ (०१-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा),**

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण वाहनसंख्येत गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ लाखांहून अधिक वाहनांची भर पडली असून ती तब्बल तीन कोटी दोन लाखांवर गेली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ मध्ये एकूण वाहनांची संख्या ३,०२,२६,८४७ एवढी होती, मात्र यात नव्या १८ लाख ५५ हजार नव्या वाहनांची भर पडली असून ही संख्या एप्रिल, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ दरम्यान ३,२०,८१,८७५ वर गेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या वाहनसंख्येमुळे पार्किंग हादेखील गंभीर विषय बनला असून त्यावरून खुनाचे गुन्हेही घडले असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरी भागांत तर वाहतूक कोंडी आणि वाहनतळांची समस्या आणखी गंभीर होत असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वाहन नोंदणीवर निर्बंध आणून वाहनांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करीत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०८-२०१८) :** (१) माहे जानेवारी २०१८ अखेर नोंदणी झालेल्या वाहनांची एकूण संख्या ३,२४,५३,७५८ इतकी आहे.

(२) माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ अखेर नोंदणी झालेल्या वाहनांची एकूण संख्या ३,०२,१७,१११ इतकी आहे.

माहे एप्रिल, २०१७ ते नोव्हेबर, २०१७ या कालावधीअखेर १७,८१,६१५ वाहनांची नोंदणी झाली असून माहे नोव्हेबर, २०१७ पर्यंत नोंदणीकृत वाहनांची संख्या ३,१९,९८,७२६ इतकी झाली आहे.

(३) ते (५) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे. राज्यातील मोठया शहरात वाहनांच्या संख्येत दरवर्षी भर पडत असल्याने वाहतूक कोंडी तसेच वाहनतळाची समस्या निर्माण होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्या अंतर्गत बनविलेल्या नियमांमध्ये वाहनाच्या नोंदणीवर निर्बंध घालण्याबाबतची तरतूद नाही.

(६) उद्भवत नाही.

---

**राहुरी कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन खानदेशात कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(१५) १०५०१० (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन खानदेशात कृषी विद्यापीठ स्थापनेसंबंधी सन २०१५ रोजी परभणी कृषी विद्यापीठाचे कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यीय समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने आपला अहवाल २०१६ रोजी शासनास सादर केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीच्या शिफारशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) :** (१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या दोन कृषि विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याकरीता लागणारा आवश्यक तपशिल प्राप्त करण्याकरीता डॉ.वेंकटेश्वरल्लू, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती.

(२) व (३) समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने व्यवहार्यता तपासून कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आनंदवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मत्स्यव्यवसाय बंदर विकसित करण्यास होत असलेला विलंब**

**(१६) १०५२८५ (०१-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मत्स्यव्यवसाय विकास बंदर विकसित करण्यास शासनाने सातव्या पंचवार्षिक योजनेत म्हणजेच माहे एप्रिल २००७ मध्ये मंजूरी देवून दहाव्या पंचवार्षिक योजनेअखेर म्हणजेच दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर पूर्ण करण्याचे योजिले असून सन २००५-२००६, २००६-२००७ व २००७-२००८ अखेर अर्थसंकल्पात सुमारे १५ कोटी ६९ लक्ष ९ हजार इतकी भराघोस आर्थिक तरतूद केल्यानंतर दिनांक १० ऑक्टोबर, २००७ रोजी आनंदवाडी येथे मासेमारी बंदर विकासाचे बांधकाम करणे भाग (१) संदर्भात कार्यारंभ आदेश दिल्यानंतर दिनांक २६ डिसेंबर, २००७ रोजी या प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात सुरूवात होवून सदरहू काम तीन टप्प्यात करण्याचे शासनाने त्यावेळी निश्चित केले होते, तथापी स्थानिक मच्छीमारांच्या जुजबी प्रतिकारामुळे सदरहू योजनेचे काम माहे मे, २००८ पासून संपूर्ण ठप्प झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाच्या पहिल्या टप्प्यातील भरावासाठी शासनाने ५ कोटी १७ लक्ष ३३ हजार इतकी रक्कमही खर्च केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) शासनाने तद्नंतर आनंदवाडी येथील मच्छीमार समाजाचे प्रतिनिधी, संबंधित अधिकारी यांच्यासमवेत एक संयुक्त बैठक संपन्न होवून ९४|९६ कोटीचा एक परिपूर्ण नवीन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ रोजी सादर केल्यानंतर केंद्र शासनाने सदरहू प्रस्तावास मंजूरीही दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू आराखडयास केंद्र शासनाची मंजूरी होवून मच्छीमार बंदराच्या प्रकल्पाचे काम कार्यरत होईल, अशी घोषणाही मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जहाज मंत्री यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.कैंद्रिय मंञ्यांच्या घोषणेनंतर आजमितीस सदरहू मस्त्यव्यवसाय बंदर विकासाचे काम प्रत्यक्षात हाती घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू बंद असलेले काम विनाविलंब मस्त्यव्यवसाय विकास बंदर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

(३) होय, हे अंशतः खरे आहे. केंद्र शासनास रु. ९२.५० कोटी रक्कमेचा सुधारीत प्रस्ताव दि. ३०.१०.२०१५ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या पुर्ततेनंतर रु. ८८.४४ कोटी रक्कमेस केंद्र शासनाने दि. २८.०३.२०१८ रोजी मंजुरी दिलेली आहे.

(४) सदर बाब वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती.

(५), (६) व (७) करिता, सदर कामास केंद्र शासनाच्या दि. २८.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये रू.८८.४४ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुषंगाने राज्य शासनाने दि. ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये आनंदवाडी येथील मत्स्यबंदराच्या बांधकामास सु-सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

---

## देऊळगावमहि (जि.बुलढाणा) येथील मानव विकास मिशनच्या बस चालकाने विद्यार्थीनीसोबत असभ्य वर्तन केल्याबाबत

**(१७) १०६७७२ (०१-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्या-येण्याकरिता शासनाने सुरु केलेल्या मानव विकास मिशनच्या बस चालकाने देऊळगावमहि (जि.बुलढाणा) येथील विद्यार्थीनीसोबत असभ्य वर्तन केल्याबाबतची तक्रार दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आगारप्रमुख यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबधित बस चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) होय.

सदरची तक्रार दि.१५.१२.२०१७ रोजी दुरध्वनीद्वारे केलेली आहे.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या मानव विकास मिशनच्या बसचे चालक श्री.विनायक किसन निर्मळे यांच्यावर शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार नियमीत आरोपपत्र देण्यात आले असून, त्यांना महामंडळाच्या निलंबन हुकूम दि.२५.०५.२०१८ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद शहरातील एसटी महामंडळाच्या सदनिका धोकादायक असल्याबाबत

**(१८) १०६९८१ (०१-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या सदनिका धोकादायक घोषित करण्यात आल्या असून त्यांना नोटिस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोटिस देवूनही १२५ घरांपैकी फक्त १० ते १५ घरे रिकामी करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित घरे अद्यापपर्यंत का रिकामे केले नाही उक्त घरांमध्ये काही दुर्घटना झाली तर त्यासाठी जबाबदार कोण,
(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित धोकादायक घरे न सोडणाऱ्या कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाद्वारे औरंगाबाद विभागीय कार्यालयाजवळील ६४ व औरंगाबाद मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील ३२ अशा एकूण ९६ सदनिका असलेल्या इमारती धोकादायक असल्याचे घोषित करण्यात आल्यामुळे त्या रिक्त करण्यात आलेल्या असून, सदर धोकादायक इमारती पाडण्याबाबतचे अंदाजपत्रक महामंडळाच्या स्तरावर तयार करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदे (जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय**

**(१९) १०७२३६ (०१-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती श्रीगोंदे (जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींकडून मागणी शासनाकडे प्राप्त झालेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत कृषी शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. तसेच सदर महाविद्यालयासाठी आवश्यक जमीन उपलब्ध नाही. नवीन कृषी महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींच्या अनुषंगाने श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर धुळे शहरात आणि अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर मूल (जि.चंद्रपूर) येथे नविन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(२०) १०७३५६ (०१-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर धुळे शहरात आणि अकोल्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर मूल (जि.चंद्रपूर) येथे नविन कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी कृषी विद्यापीठे विभागाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत विद्यापीठे विभाजनास तत्वत: मान्यता देण्यात आली असूनही एम.सी.ए.ई.आर (MCAER) कडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने व्यवहार्यता तपासून कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू या स्टील कंपनीच्या प्रकल्पा मुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व मच्छिमारी करणाऱ्या कुटूंबियांना व भात शेती जमिनीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(२१) १०७३७८ (०१-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू या स्टील कंपनीच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतक-यांना आर्थिक नुकसान भरपाई व पारंपारिक पध्दतीने मच्छिमारी करणाऱ्या कुटूंबियांना व भात शेती जमिनीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई तसेच जेट्टी बांधकामामुळे मत्स्योत्पादनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी शासनाने डॉ.चंद्रप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी समिती गठीत करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, त्यात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) करिता, डॉ.चंद्रप्रकाश समितीने प्राथमिक अहवाल सादर केला असून सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावरून कार्यवाही सुरु आहे.

---

**तालुका कृषी अधिकारी (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) या कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबत**

**(२२) १०८७४६ (०१-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका कृषी अधिकारी (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) या कार्यालय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर असुन त्याकरिता निधीसह मंजुरी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.कृषी मंत्री यांनी प्रधान सचिव (कृषी) यांना मंजुरी देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देवूनही अद्याप सदर प्रस्तावास निधीसह मान्यता अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती तालुका कृषी अधिकारी, धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) या कार्यालय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर असुन त्याकरिता निधीसह मंजुरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

मा.मंत्री (कृषि) यांनी प्रधान सचिव (कृषि) यांना "प्रकरण तपासून घेऊन मंजूरी देण्याबाबत कार्यवाही करावी" असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार तालुका कृषि अधिकारी धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) या कार्यालय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आलेले होते. आयुक्त (कृषि) यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात काही अतिरिक्त मुद्यांची माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत कार्यालयीन इमारत बांधकामाच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील कणेगाव आणि भरतवाडी गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२३) १०८९९० (०१-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील कणेगाव आणि भरतवाडी या गावांना वारणा नदीच्या महापुरामुळे नेहमीच नैसर्गिक आपत्तीला तोंड दयावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर गावांचे पुनर्वसन करण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) शासन धोरणानुसार कणेगाव व भरतवाडी (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातील अनुक्रमे २५७ व २४ कुटुंबे पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, पुनर्वसनातील लाभार्थी ग्रामस्थांना देय घरांचा टाईप प्लॅन मान्य नसल्याने, त्यांनी बांधकाम बंद पाडले. लाभार्थी ग्रामस्थांच्या विनंतीनुसार पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून अनुदान प्रक्रियेत सुलभता आणण्याबाबत**

**(२४) १०९५२६ (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून वाटप करावयाच्या वस्तूंसाठी खरेदी पावती नव्हे तर संबंधित दुकानदाराला वस्तूंची किंमत अदा केल्याचा बँकेतील नोंदीचा पुरावा दिला तरच लाभार्थी रक्कम बँक खात्यात जमा होणार असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे आधी रक्कम कोणत्या प्रकाराने उभी करावी व बँकेद्वारेच अदा कशी करावी हा मार्ग काढताना गरीब लाभार्थींना अडचणी येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे अनेक गरीब शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने या अनुदान प्रक्रियेत सुलभता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) नाही. आर्थिक दृष्टीने दुर्बल शेतकऱ्यांना शासन धोरणानुसार कृषी औजरांची खरेदी करणे सोयीस्कर व्हावे याकरीता जिल्हायाचे पत आराखडयामध्ये योग्य ते उदिष्ट व आर्थिक तरतुदीचा समावेश करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील परिवहन आर.टी.ओ.कॅम्प ऑड्गिस यांचा पंढरपूर शहर येथे कॅम्प सुरू करणेबाबत**

**(२५) १०९८०७ (०१-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील परिवहन आर.टी.ओ.कॅम्प ऑड्गिस यांचा पंढरपूर शहर येथे ३ दिवस ऐवजी आठवड्यातून ४ दिवस कॅम्प सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे विनंती केली आहे,

(२) असल्यास, परिवहन विभागाकडून अद्यापही हे कॅम्प कार्यालय आठवड्यात ४ दिवस नियमित सुरू करणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती परिवहन विभागाकडून कॅम्प कार्यालय नियमित सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेमार्फत पंढरपूर शिबीर कार्यालयामध्ये कच्ची अनुज्ञप्ती व पक्की अनुज्ञप्ती साठी ९०चा कोटा आहे. प्रत्यक्षात सरासरीपेक्षा निम्मेच अनुज्ञप्ती होतात. पंढरपूर शहरात प्रत्येक महिन्यात एकुण ६ ते ७ शिबीर आयोजित केली जातात. कामाची व्याप्ती विचारात घेता शिबीर दौरे वाढविण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आपत्कालिन व्यवस्थापनाचे नियम करण्याबाबत**

**(२६) ११००३९ (०४-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने आपत्ती व्यवस्थापन कायदा देशभर लागू केलेला असतानाही राज्य सरकारने १२ वर्षापासून त्यासाठीचे नियमच तयार केलेले नसल्याने मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने तीन महिन्यांच्या आत नियम तयार करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापनाचे नियम लवकरात लवकर तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१) अशाप्रकारचे मत मा.उच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे.
(२) होय.
(३) व (४) दिनांक २७.१.२०१७ रोजी राज्यशासनाने आपत्ती व्यवस्थापन नियम तयार करण्याकरिता माझी अप्पर मुख्य सचिव श्री.उमेशचंद्र सारंगी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समिती मध्ये आपत्ती व्यवस्थापन व विधी क्षेत्रातील तज्ञांचा समावेश होता. आपत्त्ती व्यवस्थापन २००५ तयार करण्यात जांच्या मोठा वारा होता असे श्री. सजनानी, माजी संचालक, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नवी दिल्ली यांचादेखील या समितीमध्ये समावेश होता. या समितीने नियमांचा मसुदा तयार करुन राज्य शासनाला सादर कलेला आहे. या नियमांबाबतचे सविस्तर सादरीकरण समितीचे सदस्य सचिव यांनी अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन यांच्यकडे केले आहे.त्यानुसार सदर मसुदा विधी विभागाकडे परिक्षणासाठी पाठविण्यात येत आहे.

---

## शासनाच्या परिवहन विभागातील मोटर वाहन निरीक्षकांच्या पदोन्नतीमधील तांत्रिक बाब दूर करण्याबाबत

**(२७) ११०४७४ (०१-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या परिवहन विभागात मोटर वाहन निरीक्षकास पदश्रेणीत "अ"दर्जा देण्यात आला आहे याच मोटार वाहन निरीक्षकास पदोन्नती मिळाल्यानंतर सहाय्यक परिवहन अधिकारी हा दर्जा मिळतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र या पदोन्नीतील "अ" दर्जा जाऊन त्यांना "ब" दर्जा मिळतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पदोन्नतीवरील ही तांत्रिक बाब दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१), (२) व (३) सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदांचे सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. यापूर्वी मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक यांना दि.२०.२.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये

राजपत्रित गट-अ (कनिष्ठ स्तर) या पदाचा दर्जा हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून दिलेला होता. मात्र सेवाप्रवेश नियमांत सुधारणा केलेली नव्हती. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील पदे मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील ६०% पदांमधून पदोन्नतीने भरण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथील कृषि कार्यालयाकडून रोटाव्हेटरचे देण्यात येणारे अनुदान रखडल्याबाबत**

**(२८) ११०५५४ (०१-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड येथील (जि.यवतमाळ) कृषि कार्यालयाकडून रोटाव्हेटरचे देण्यात येणारे अनुदान रखडल्यामुळे एका शेतकऱ्यांने कृषि कार्यालयात अधिकाऱ्यासमोरच विष प्राशन केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) नाही, श्री.ज्ञानेश्वर मारोती शिंदे, रा.झाडगांव, ता.उमरखेड, जि.यवतमाळ यांनी, जिल्हाधिकारी यवतमाळ यांना दिलेल्या निवदेनमध्ये अनुदान न मिळाल्यास आत्महत्या करावी लागेल असे नमूद केले होते.
(२) व (३) श्री.शिंदे यांनी रोटाव्हेटरची खरेदी करुन दि. २१ नोव्हें, २०१७ रोजी तालुका कृषी अधिकारी उमरखेड यांच्याकडे अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर केल्यानंतर, शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेनुसार मोका तपासणी करुन दि. १० डिसें, २०१७ पर्यंत अनुदानाची रक्कम श्री. शिंदे यांच्या बँक खात्यावर जमा करणे आवश्यक होते. श्री. शिंदे यांच्या बँक खात्यावर प्रत्यक्षात अनुदानाची रक्कम दि.८ डिसें,२०१७ रोजी जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२९) ११०८२८ (०१-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयासह ३ तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गत एकुण १३८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात अधिक्षक कृषी अधिकारी-१, तालुका कृषी अधिकारी-३, तंत्र अधिकारी-४, सहाय्यक प्रशासन अधिकारी-१, कृषी अधिकारी-३, मंडळ कृषी अधिकारी-३, अधिक्षक-२, वरीष्ठ लिपीक-८, लिपीक-७, कृषी पर्यवेक्षक-१३, कृषी सहाय्यक-३, लघु टंकलेखक-२, आरेखक-२, अनुरेखक-३९, वाहनचालक-८, रोपमळा सहाय्यक-११, मजुर-३ व सेवकाची २३ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रिक्त पदांमुळे कृषी विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होत असुन शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उस्मानाबाद जिल्हयातील कृषी विभागाच्या रिक्त जागा त्वरित भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद व अधिनस्त असलेल्या कार्यालयांमध्ये एकूण १३३ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद व अधिनस्त असलेल्या कार्यालयांमध्ये तालुका कृषि अधिकारी-२, तंत्र अधिकारी-८, सहा. प्रशासन अधिकारी-१, कृषि अधिकारी-२, मंडळ कृषि अधिकारी-३, अधिक्षक-२, वरिष्ठ लिपिक-८, लिपिक-५, कृषि पर्यवेक्षक-१४, लघुटंकलेखक-२, आरेखक-१, अनुरेखक-४०, वाहनचालक-८, रोपमळा मदतनीस-११, शिपाई-२३, मजूर-३ पदे रिक्त आहेत.

(३) रिक्त असलेल्या मुख्यालयांचा व पदांचा अतिरिक्त पदभार इतर अधिकारी/कृषि सहाय्यकांकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाच्या कृषी विषयक योजना शेतकऱ्यांपर्यत पोचविण्यात येत आहेत.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि सेवा परीक्षा-२०१७ च्या आधारे अंतीम निवड झालेल्या महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ७९ उमेदवारांची शिफारस शासनास केलेली आहे, त्यानुसार सदर ७९ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त कृषि सेवा गट-ब संवर्गातील ८३ पदांचे व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

कृषि सहाय्यकांच्या ९०८ रिक्त पदांसाठी परीक्षा घेण्यात आलेली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा. अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाची पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याणच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नुतनीकरणाकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३०) ११०९४८ (०१-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याणच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नुतनीकरणाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास कल्याण महापालिकेचे विरोधी पक्ष नेते यांनी लेखी निवेदनाद्‌वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नुतनीकरणाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. कल्याण कार्यालयाचे बांधकाम करून अंतर्गत सोयीसुविधा निर्माण करून देणेबाबत संबंधितांनी विनंती केली होती.

(२) व (३) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम मौजे वाडेघर, ता. कल्याण येथील स.क्र. ५५-अ, क्षेत्र १-३९-० हे. आर या भुखंडावरील ८२२०.०० चौ.मी. जागेवर करण्याकरिता रू. १०,४६,२६,९४२/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व नकाशांना दि.१७.४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अवैध प्रवासी वाहतूक तसेच छुप्या पद्धतीने चालणाऱ्या वाहतुकीस प्रतिबंध करण्याबाबत**

**(३१) १११०११ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्यागो रिक्षातून अवैध प्रवासी वाहतूक तसेच छुप्या पद्धतीने चालणाऱ्या वाहतुकीस प्रतिबंध करण्याबाबत शासनाने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकान्वये खेड तालुक्यात (जि.पुणे) आतापर्यंत एकूण किती वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अवैध वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०८-२०१८) :** (१) होय.
(२) ते (४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड या कार्यालयातील वायुवेग पथकामार्फत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येवून दोषी आढळून येणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येते.

माहे एप्रिल, २०१५ ते माहे मार्च, २०१८ या कालावधीत खेड तालुक्यातील अवैध प्रवासी वाहतुक व छुप्या पध्दतीने चालणाऱ्या वाहतुकीविरुध्द केलेल्या कारवाईत एकूण ७६७ वाहनांवर कारवाई केली असून सदर कारवाईतून रू.२०.५५ लाख दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमारांना डिझेल विक्रीकर प्रतिपूर्ती मिळणेबाबत

**(३२) १११५५४ (०१-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारष्ट्र शासन मत्स्यव्यवसाय विभागाकडून मच्छिमारांना नौकांकरीता देण्यात येणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या डिझेलवरील प्रतिपुर्ती परतावा माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती मच्छिमारांना नौकांकरीता देण्यात येणाऱ्या डिझेलवरील प्रतिपूर्ती परतावा मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात डिझेल प्रतिपुर्तीसाठी रु.६०.०० कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी रु. ४२.०० कोटी जुलै, २०१७ मध्ये तर उर्वरित रु.१८.०० कोटी निधी मार्च, २०१८ मध्ये वितरीत केला. तसेच, रु.२५.०० कोटी एवढा निधी दि.२८.३.२०१८ रोजी वितरीत करण्यात आला आहे. अशा प्रकारे सन २०१७-१८ मध्ये डिझेल प्रतिपूर्तीसाठी रु.८५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील अनेक ठिकाणच्या द्राक्षबागांचे डाऊनी रोगामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(३३) १११६८७ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या द्राक्षबागांचे डाऊनी रोगामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे मिरज-पंढरपूर राज्यमार्गालगतचे शेळकेवाडी ते जुनोनी पट्ट्यातील निम्म्याहून अधिक बेदाणा शेड्स ओस पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या बेदाणा व्यवसायास उर्जितावस्थेत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही. सांगली जिल्ह्यामध्ये जानेवारी, २०१८ वा त्या दरम्यान द्राक्ष बागांवर डाऊनी रोगाचा प्रादुर्भाव होऊन द्राक्ष पिकांचे नुकसान झाल्याचे निर्देशनास आलेले नाही.
(२) सांगली जिल्ह्यामध्ये सध्या द्राक्ष उत्पादक शेतकरी बेदाणा तयार करण्याऐवजी स्थानिक बाजारपेठेमध्ये द्राक्ष विक्री करत आहेत. परिणामी बेदाणा निर्मितीसाठी द्राक्षाची आवक घटल्यामुळे काही प्रमाणात मिरज पंढरपूर राज्य मार्गालगतचे शेळकेवाडी ते जुनोनी पटयामध्ये बेदाणा शेड् रिकाम्या दिसत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कृषि कार्यालयातील १५ पैकी ८ रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(३४) १११७२७ (०१-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कृषि कार्यालयातील १५ पैकी ८ पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
तालुका कृषी अधिकारी हातकणंगले कार्यालयात माहे डिसेंबर, २०१७ अखेर १६ मंजूर पदांपैकी ९ पदे रिक्त होती.
(२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि सेवा परीक्षा-२०१७ च्या आधारे अंतीम निवड झालेल्या महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ७९ उमेदवारांची शिफारस शासनास केलेली आहे, त्यानुसार सदर ७९ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु

आहे. त्याव्यतिरिक्त गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

कृषि सहाय्यकांच्या ९०८ रिक्त पदांसाठी परीक्षा घेण्यात आलेली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि.२५.०५.२०१७ अन्वये प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा.अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाची पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यभरातील ८० टक्के मोटार वाहन निरिक्षकांनी वयोज्येष्ठतेनूसार सहाय्यक प्रदेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) पद मिळणाऱ्या पदोन्नतीला नकार दिल्याबाबत**

**(३५) ११२३०७ (०१-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील काही वर्षात राज्यभरातील तब्बल ८० टक्के मोटार वाहन निरिक्षकांनी वयोज्येष्ठतेनुसार सहाय्यक प्रदेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) पद मिळणाऱ्या पदोन्नतीला नकार दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यभरातील एआरटीओ च्या ३० जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर रिक्त असलेल्या जागेबाबत व पदोन्नती नाकारणारे मोटार वाहन निरिक्षकांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) मोटार वाहन निरीक्षक संवर्गातून सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी ही पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही चालू आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नती नाकारण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी कार्यपध्दती विहीत केली आहे. त्यानुसार पुढील तीन वर्षे अशा अधिकारी कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करु नये असे आदेश शासनाने दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रती थेंब अधिक पिक (सुक्ष्मसिंचन)अभियानाचा सर्वसाधारण प्रवर्गाचा सन २०१६-१७ चा अखर्चित निधी पुनर्जिवित करुन चालु वर्षी विनियोगात आणण्यास मान्यता देण्याबाबत**

**(३६) ११२७२१ (०१-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रती थेंब अधिक पिक (सुक्ष्मसिंचन) अभियानाचा सर्वसाधारण प्रवर्गाचा सन २०१६-१७ चा अखर्चित निधी पुनर्जिवित करुन चालु वर्षी विनियोगात आणण्यास मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी निर्गमित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अखर्चित निधी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत खर्च करण्यास केंद्र शासनाकडील पत्र कृषी, सहकार व शेतकरी कल्याण मंत्रालय, क्रमांक १९-७/२०१६ आरएफएस & १११, दिनांक १६. ऑक्टोबर, २०१७ रोजी कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी निर्देश देवूनही सदर शासन निर्णय निर्गमित होण्यास ११ जानेवारी, २०१८ एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदर विलंबास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३), (४), (५) व (६) केंद्र शासनाचे दि.१६ ऑक्टोबर, २०१६ चे पत्र विभागात दि.२६ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्राप्त झाले. सदर निधी पुनर्जिवित असल्याने, निधी वितरणास नियोजन व वित्त विभागाची मान्यता आवश्यक होती. त्यानुसार, हा निधी चालू वर्षात खर्च करण्यास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी दि. ७.११.२०१६ रोजी सादर करण्यात आला. नियोजन व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यांनतर, दि. ११ जानेवारी, २०१७ रोजी निधी वितरणाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सबब, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यानुसार आवश्यक पूर्तता करण्यास काही अपरिहार्य कालावधी लागला आहे. त्यामुळे, या प्रकियेत कोणताही विलंब जाणीवपुर्वक झाला नसल्याने अधिकाऱ्यांच्या कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात कृषी खात्यामध्ये जिल्हा अधीक्षकासह १३९ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) ११३३७८ (०४-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान**

**(चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात कृषी खात्यामध्ये जिल्हा अधीक्षकासह १३९ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्ये कृषी खात्यांतर्गत किती पदे रिक्त आहेत,

(३) असल्यास, कृषी खात्यामध्ये जिल्हा अधीक्षकासह पदे रिक्त असल्याने कामाची गती देखील मंदावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यामध्ये कृषी खात्याच्या रिक्त जागा लवकरात लवकर भरुन शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०८-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे मार्च २०१८ अखेर विभागीय कृषि सह संचालक, लातूर कार्यालय, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, लातूर व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिनस्त कार्यालयात ७३७ पदे मंजूर असून ५७३ पदे भरलेली आहेत व १६४ पदे रिक्त आहेत.

(२) कृषि विभागामध्ये एकूण २७५०२ पदे मंजूर असून १९३६९ पदे भरलेली आहेत व ८१३३ पदे रिक्त आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

रिक्त असणाऱ्या पदाचा कार्यभार अन्य अधिकारी/ कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आला असून कामकाज करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ संवर्गातील सरळसेवेच्या ९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

जिल्हा परिषदेच्या तालुका कृषि अधिकारी पदावर १७ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आलेला आहे.

गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २५२ रिक्त पदांपैकी ७९ पदांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेली असून त्यानुसार भरती प्रक्रियेची पुढील कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत १७३ पदांचे मागणीपत्र आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

गट-क संवर्गातील कृषि सहाय्यकांच्या ७३० पदांच्या निवड यादीतील उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे. याव्यतिरिक्त ९०८ पदांसांठी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दि.२४.४.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला असून त्यानुसार पुढील भरती प्रक्रिया विभाग स्तरावर सुरु आहे.

या व्यतिरिक्त आयुक्त (कृषि) यांनी कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यकांची पदोन्नतीची रिक्त पदे पुढील ३-४ महिन्यात भरण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतलेली आहे.

तसेच,वित्त विभागाच्या दि.२५.५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार विभागाचा आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर गट-क संवर्गातील सहाय्यक अधिक्षक, लिपिक तसेच गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोसेखुर्द प्रकल्प बाधित वाढीव कुटुंबांना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम प्रदान करणेबाबत

**(३८) ११३५३५ (०१-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (जि.भंडारा) येथील 'अ' 'ब' 'क' संवर्गातील प्रकल्प बाधित कुटुंबाना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष चा लाभ देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे परंतु सदर तालुक्यातील प्रकल्प बाधित कुटुंबाना लाभ देण्याऐवजी सदर महसूल अधिका-यामार्फत तसेच जिल्हा प्रशासनाकडून प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळाले व अवार्ड मध्ये नाव असूनही त्यांचे मतदार यादीत नाव नाही तसेच काही कुटुंबातील सदस्य उदरनिर्वाह करिता बाहेर गावी गेल्याने मतदार यादीतून त्यांचे नाव कपात करण्यात आले या प्रमाणे क्षुल्लक कारण पुढे करून लाभार्थीना लाभापासून वंचित ठेवण्याचा गैरप्रकार सुरु असल्याची तक्रार माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा. महसूलमंत्री मंत्रालय मुंबई व जिल्हाधिकारी भंडारा यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त प्रकरणी वाढीव कुटुंबात नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम प्रदान करण्यासाठी तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तातडीने निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

महसूल व वन विभाग,शासन निर्णय क्रमांक आरपीए-२०१५/प्र.क्र.९९/र-१, दि.१९.८.२०१५ अन्वये "अ" "ब" आणि "क" या व्यक्तीरिक्त कलम १३ (१) च्या अधिसूचनेच्या दिवशी गावात रहिवास करीत असल्याबाबत इतर कोणी दावा दाखल केल्यास व ते कुटुंब पुनर्वसन कायदात नमूद कुटुंबाच्या व्याखेनुसार आवश्यक अटींची पूर्तता करीत असल्यास त्यांना योग्य पुराव्याच्या तपासणी अंती नोकरी ऐवजी एकमुस्त रकमेचा लाभ देण्यात यावा असे निर्देश आहेत.

मा.जिल्हाधिकारी, भंडारा यांचे पत्र दि.९.१०.२०१५ नुसार बाधित कुटुबांना एकमुक्त रक्कम २.९० लक्ष लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांचे दि.२२.३.२०१७ रोजीचे कार्यवृत्तानुसार ज्या प्रकल्पग्रस्तांचे सन १९९५-९६ च्या मतदार यादीत नाव आहे परंतु १९९७-९८ च्या मतदार यादीतून नाव वगळण्यात आले आहे व नंतर पुन्हा १९९८-९९,१९९९-२००० च्या मतदार यादीतून नाव असलेल्या कुटुबांना वाढीव कुटुंबाचा रहिवास सलग ग्राहय धरण्यात यावा असे निर्देश असल्यामुळे वाढीव कुटुबांना

लाभ देण्यात येत आहे. उपजिल्हाधिकारी, गोसेखुर्द यांनी वाढीव कुटुबांची ई-आर प्रत प्रमाणित केल्यानंतर सन १९९७ च्या विधानसभेच्या मतदार यादीचा आधार घेऊनच वाढीव कुटुबांना लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३९) ११३५४६ (१२-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात इमारत दुर्घटनाचे वाढते प्रकार वारंवार लागणाऱ्या आगी व निर्माण होणारी पूरसदृश्य परिस्थिती, आकस्मिक होणारे अपघात विचारात घेता अचानक उद्‌वलेली परिस्थिती हाताळण्यासाठी मुंबईत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये अंमलात आणलेल्या आपत्ती व्यवस्थापन कायदयाची अंमलबजावणी मागील १३ वर्षांपासून शासनाने अद्याप केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०१०/प्र.क्र.११७ /आव्यप्र-१, दिनांक १९ जानेवारी, २०११ अन्वये आयुक्त, मुबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली बृहन्मुंबई आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरुन दिनांक २०.४.२०१८ च्या अधिसुचनेन्वये मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

(२) नाही.

(३) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जी कामे करणे अपेक्षित आणि आवश्यक आहेत उदा. आपत्ती व्यवस्थापन, शोध व बचाव कार्य, पूर्वतयारी याबाबी बृहन्मुंबई आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाव्दारे करण्यात येत आहेत. वरील कार्यवाही आता नव्याने स्थापन करण्यात आलेल्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाव्दारे करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील माहिम समुद्रातील यांत्रिक बोटींमुळे मच्छीमारांची उपासमार होत असल्याबाबत**

**(४०) ११४०७६ (०१-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम, वरळी, वांद्रे रेक्लेमेशन येथील दोनशेहून अधिक मच्छीमार माहिमच्या समुद्रात दररोज मासेमारी करतात छोट्या जाळ्यांमध्ये मिळणाऱ्या मासळीवरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिनाभरापासून पर्यटकांची ने-आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या यांत्रिक बोटी सुसाट जात असल्याने जाळी तुटणे, होड्यांना धडक बसणे, त्यामुळे मच्छीमारांना त्यांचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सर्वसामान्य गरीब कोळी बांधवांना येणाऱ्या अडचणीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०८-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोथरा नाला प्रकल्प व लाल नाला प्रकल्प, (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांच्या प्रकल्पात गेलेल्या जमिनधारकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याबाबत किंवा प्रकल्पग्रस्त प्रत्येक कुटुंबास २० लाख रुपये देण्याबाबत**

**(४१) ११४२०८ (०१-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोथरा नाला प्रकल्प व लाल नाला प्रकल्प, (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांच्या प्रकल्पात गेलेल्या जमिनधारकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासन निर्णय दि.२१.१.१९८० नुसार नोकरी देण्याबाबत किंवा प्रकल्पग्रस्त प्रत्येक कुटुंबास २० लाख रुपये देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी मा.महसूल व पुनर्वसन, मदतकार्य मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१८) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दि.२७.१०.२००९ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या व भूकंपग्रस्तांच्या नेमणुका जाहिरात देवून संबंधित

पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमदेवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेव्दारे, गुणवत्तेनुसार करण्याची तरतूद आहे.

त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना व भूकंपग्रस्तांना शासन सेवेतील गट क व ड मधील पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाल (ता.रावेर, जि.जळगांव) येथे उद्यान विद्या महाविद्यालय कार्यान्वीत करण्याबाबत**

**(४२) ११४९८३ (०१-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाल, (ता.रावेर, जि.जळगांव) येथे शासनाने उद्यान विद्या महाविद्यालय मंजूर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्याबाबत जळगांव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास पत्र देऊनही शासनस्तरावर कोणतेही प्रयत्न करण्यात आलेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालय कालबध्द कार्यक्रम जाहिर करुन तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) कार्यवाही चालू आहे.

---

**सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील कृषि अवजारे निर्मिती व संशोधन प्रकल्प कार्यान्वीत करण्याबाबत**

**(४३) ११५०१२ (०१-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालबर्डी, (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील केंद्र शासनाचा कृषि अवजारे निर्मिती व संशोधन प्रकल्प कार्यान्वीत करण्याबाबत स्थानिक जनतेने मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मानेगांव, (ता.मुक्ताईनगर) येथे भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन नवनवीन बियाणे संशोधन करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कृषि विज्ञान केंद्रासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सालबर्डी, (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील केंद्र शासनाचा कृषि अवजारे निर्मिती व संशोधन प्रकल्प कार्यान्वीत करण्याबाबत तसेच मानेगांव, (ता.मुक्ताईनगर) येथे कृषि विज्ञान केंद्रासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) मागणी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) कृषी विज्ञान केंद्राच्या मागणीचा प्रस्ताव महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) केंद्र शासनाने कळविल्यानुसार, राज्यात कृषी यंत्रे तपासणी व प्रशिक्षण संस्था उभारण्यासाठी सालबर्डी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील जागेचा प्रस्ताव केंद्र शासनास दि. ७ मे, २०१६ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाच्या पथकाने केलेल्या पाहणीत सदर जागा संस्था उभारणीस योग्य नसल्याचे आढळून आल्याने, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील जागेचा प्रस्ताव केंद्र शासनास दि.६ सप्टेंबर, २०१६ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमराळे बु. (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) ११५१४९ (०१-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमराळे बु. (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात गेल्या तीन वर्षापासून पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याने नागरिकांना खाजगी दवाखान्यात जनावरांचे उपचार करावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३०-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही,

पशुवैदयकीय दवाखाना श्रेणी-१ उमराळे, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील पशुधन विकास अधिकाऱ्याचे पद सेवानिवृतीमुळे रिक्त झाले असले तरी सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.०१.०२.२०१६ पासून अन्य अधिकारी यांचेकडे सोपवून पशुपालकधारक शेतकरी

यांच्या जनावरांना नियमित वैद्यकीय सोयी- सुविधा पुरविण्यात येत असून दवाखान्यातील कामकाज सुरळीत चालू आहे.
(३) सन २०१८ च्या सार्वजनिक बदल्यांच्या वेळी तसेच पशुधन विकास अधिकारी,गट-ब पदोन्नतीच्या वेळी पदस्थापना करतांना प्रस्तुत पद भरण्याबाबत शासन स्तरावर विचार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नियम डावलून वाहन योग्यता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत**

**(४५) ११५३०५ (०१-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बुलडाणा जिल्हयासह ठाणे, पनवेल, कोल्हापूर व यवतमाळ येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातून नियमबाहय दिल्या गेलेल्या वाहन योग्यता प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबिधत परिवहन अधिकाऱ्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने शासनाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१८) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.२८/२०१३ मध्ये परिवहन संवर्गातील वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तपासणीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार परिवहन आयुक्तालयातील वरिष्ठ अधिका-यांच्या पथकाने ठाणे, पनवेल, औरंगाबाद, कोल्हापूर व यवतमाळ याठिकाणचे वाहन योग्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाचे चित्रीकरण तपासले असता, मोटार वाहन कायदा कलम ६२ नुसार निर्धारित सर्व तपासण्या केल्याचे व्हिडिओ चित्रीकरणात दिसून आले नाही. त्यामुळे दि.२१.०८.२०१७ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीतील निर्णयानुसार संबंधित अधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी संबंधित मोटार वाहन निरीक्षक व त्यांचे नियंत्रक अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस परिवहन आयुक्त यांचे स्तरावरुन बजावण्यात आली होती. त्यासंदर्भात प्राप्त झालेले खुलासे विचारात घेवून व ताकीद देवून संबंधित अधिकाऱ्यांकडे योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरणाचे कामकाज पुर्ववत सोपविण्याचा निर्णय परिवहन आयुक्त कार्यालयाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी विभागातील ८००० पदे रिक्त असल्याबाबत**

**(४६) ११५४२७ (०१-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागातील ८००० पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे एकूण मंजुर पदांच्या ४०% एवढी असून हयात कृषी आयुक्तालय, कृषी सहसंचालक आणि क्षेत्रीय कार्यालयामधील पदे आहेत याचा सर्वाधिक नुकसान दुष्काळग्रस्त विदर्भ आणि मराठवाडयाचा होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रामुख्याने विदर्भात बोंडअळीग्रस्त शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून पंचनामे करतेवेळी तसेच पिक विमा संदर्भात विलंब झाल्याने प्रकर्षाने लक्षात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती वित्त विभागाच्या २५ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार आकृत्तीबंध मंजुर झाल्यानंतर सदरहू पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कृषि विभागामध्ये माहे मार्च २०१८ अखेर एकूण २७५०२ पदे मंजूर असून १९३६९ पदे भरलेली आहेत व ८१३३ पदे रिक्त आहेत.

(२) माहे मार्च २०१८ अखेर एकूण २७५०२ पदे मंजूर असून १९३६९ पदे भरलेली आहेत व ८१३३ पदे रिक्त आहेत. एकूण मंजूर पदांच्या ३०% एवढी पदे रिक्त आहेत.

रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त पदभार इतर संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडे देण्यात आला असून योजनांची अंमलबजावणी सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

किडीचे प्रादुर्भावामुळे होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे केले जात नाही. तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या स्थानिक नैसर्गिक आपत्ती (गारपीट, भुस्खलन व पुराचे पाणी शेतात शिरुन झालेले नुकसान) व काढणी पश्चात नुकसान (अवेळी पाऊस व चक्रीवादळ) या बाबींसाठी वैयक्तीकस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेस्तव महसुल विभाग, कृषि विभाग व विमा कंपनीचे प्रतिनिधी यांचे संयुक्त समितीमार्फत पंचनामे केले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) वित्त विभागाच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतीबंध मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आलेला असून त्यास अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही.

कृषि सेवा गट-अ संवर्गातील १७ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

गट-ब संवर्गातील ८३ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या १७३ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. त्याव्यतिरिक्त ७९ उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेली असून त्यानुसार ७९ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे.

कृषि सहाय्यकांची ७३० पदांची नियुक्ती करुन त्यानंतर पून्हा कृषि सहाय्यकांच्या ९०८ रिक्त पदांसाठी परीक्षा घेण्यात आलेली आहे.

कृषि अधिकारी पदावरुन तालुका कृषि अधिकारी पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

कृषि पर्यवेक्षक पदावरुन कृषि अधिकारी पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.

तसेच आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर गट-क संवर्गातील लघुलेखक (उच्च श्रेणी)लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुटंकलेखक, अनुरेखक, सहा.अधिक्षक, वरिष्ठ लिपिक, लिपिक व वाहनचालक ही पदे भरण्यात येतील.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टेस्टिंग ट्रॅक ची कमतरता तसेच ऑनलाईन यंत्रणेतील दोषामुळे वाहनमालकांची होत असलेली गैरसोयबाबत**

**(४७) ११५७२१ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे परिवहन संवर्गातील (रिक्षा, टक्सी, बस, ट्रक, टेम्पो व ट्रेलर इ.) वाहनांचे नुतनीकरण करण्याकरिता २५० मीटरचा ट्रॅक प्रत्येक प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यात रिक्षा, टेम्पो, ट्रक बस अशा विविध वाहनांचे पासिंग करण्यासाठी न्यायालयाच्या निर्देशानुसार दिवे येथे तयार केलेल्या टेस्टिंग ट्रॅकवर फक्त ७५ वाहनांचेच पासिंग एका दिवसात करण्यात येत आहे त्याचबरोबर वाहन चालकांना पासिंगसाठी घ्यावी लागणाऱ्या ऑनलाईन अपॉइंटमेंट यंत्रणेत एका महिन्याची अपॉइंटमेंट नोंदणी झाल्यानंतर पुढील अपॉइंटमेंट मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात टेस्टिंग ट्रॅक ची कमतरता तसेच ऑनलाईन यंत्रणेत असणारे दोष यामुळे वाहनमालकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याने अनेक संघटनांनी पुणे येथे माहे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील हजारो वाहनांचे रखडलेले पासिंग करण्याकरिता टेस्टिंग ट्रॅक ची कमतरता तसेच ऑनलाईन यंत्रणेत असणारे दोष दूर करण्याबाबत शासनाने काय निर्णयात्मक उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे च्या कार्यक्षेत्रात वाहन योग्यता प्रमाणपत्र तपासणी सुविधेत सरासरी दैनंदिन ३०० वाहनांची तपासणी केली जाते.

मोटार वाहन कायद्यांतर्गत जारी करण्यात येणा-या योग्यता प्रमाणपत्रावर विधीग्राहृयता व पुढील वर्षीचा चाचणी दिनांक नमुद केलेला असतो. सदर दिनांक योग्यता प्रमाणपत्राच्या विधीग्राहृयतेच्या ३० दिवस आगोदरचा असल्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाकरिता पूर्वनियोजीत वेळ आरक्षीत करण्यासाठी जास्तीत जास्त ३० दिवसापर्यंतचा कालावधी निश्चित केलेला आहे.

(३) होय.

(४) दि. ०१ नोव्हेंबर, २०१७ पासून कार्यान्वीत करण्यात आलेली संगणकीकृत अपॉइंटमेंट सुविधा व दिवे घाट येथे तयार करण्यात आलेल्या टेस्ट ट्रॅक च्या माध्यमातून दैनंदिन सरासरी ३०० वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड (मोशी) येथील ब्रेक टेस्ट ट्रॅक वर दररोज ४० ऑटोरिक्षांची योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी तपासणी करण्याची अतिरिक्त सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील कृषी विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

**(४८) ११५७४० (०१-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती अंतर्गत अमरावती जिल्हयातील कृषी विभागाची ९९१ पदापैकी ३९२ पदे रिक्त असल्यामुळे अमरावती जिल्हयातील रिक्त पदांचा अनुशेष त्वरीत पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी सहसंचालक, कृषी विभाग, अमरावती यांना निवेदनाद्वारे मागणी केली आह, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या निवेदनाच्या अनुषंगाने रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

अमरावती जिल्हयातील रिक्त पदांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.२९.११.२०१७ रोजी विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि सेवा परीक्षा-२०१७ च्या आधारे अंतीम निवड झालेल्या महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ७९ उमेदवारांची शिफारस शासनास केलेली आहे, त्यानुसार सदर ७९ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त कृषि सेवा गट-अ संवर्गातील ९ पदांचे, कृषि सेवा गट-ब संवर्गातील ८३ पदांचे व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे.

कृषि सहाय्यकांच्या ९०८ रिक्त पदांसाठी परीक्षा घेण्यात आलेली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा. अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाची पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात पाटबंधारे प्रकल्पाचे बनावट लाभार्थी दर्शवून जमिनी वाटप केल्याबाबत**

**(४९) ११५७७२ (०१-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात विशेषतः पुणे जिल्हयात पाटबंधारे प्रकल्पाचे बनावट लाभार्थी दर्शवून हेक्टर जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट लाभार्थ्यांना किती हेक्टर जमिनीचे वाटप झाले आहे,

(३) असल्यास, उक्त बनावट केलेले वाटप रद्द देखील करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खोटे लाभार्थी दाखवून आदेश निर्गमित करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०८-२०१८) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) दौंड तालुक्यातध्ये २८९ हे. ८५ आर व मुळशी तालुक्यात ६९ आर वाटप केलेली जमीन सरकार जमा करण्यात आली असून सदर जमिनीवर उपसंचालक (पुनर्वसन) तथा जिल्हा अधिकारी, पुणे यांचे नांवे दाखल करण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी पुणे जिल्हयातील निवासी झोन मधील काही जमिनी ठराविक प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(५०) ११५७७३ (०१-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी पुणे जिल्हयातील निवासी झोन मधील काही जमिनी ठराविक प्रकल्पग्रस्तांना वाटप केले असल्याची किती प्रकरणे आजतागायत निदर्शनास आली आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकारणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी पुणे जिल्हयातील निवासी झोन मधील काही जमिनी ठराविक प्रकल्पग्रस्तांना वाटप केले असल्याबाबत शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०८-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.